नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/१०/२०२६ (गुरूवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा—२०२६ उत्साहात संपन्न

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा — २०२६ चे आयोजन पोलीस मुख्यालय मैदान, टेकानाका, नागपूर ग्रामीण येथे करण्यात आले होते. ३ दिवसीय या स्पर्धेचा समारोप मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १५/१०/२०२६ रोजी पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सदर स्पर्धेमध्ये नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील ४ संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये १) मुख्यालय संघ, २) काटोल—सावनेर संघ, ३) नागपूर—उमरेड संघ आणि ४) रामटेक—कन्हान संघ यांचा समावेश होता.या स्पर्धेदरम्यान १००० मीटर धावणे (पुरुष), १५०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, ५ किलोमीटर धावणे, ४ × १०० मीटर रिले, ४ × ४०० मीटर रिले, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी, व्हॉलीबॉल, खो—खो, फुटबॉल, कबड्डी आणि हॉकी अशा विविध मैदानी व सांघिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पोलीस अधिकारी व अंमलदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध क्रीडा प्रकारांमध्ये आपले कौशल्य व क्रीडानैपुण्य प्रदर्शित केले. स्पर्धेमध्ये मुख्यालय संघाने सर्वाधिक पदके पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या क्रीडा स्पर्धांमुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, खिलाडूवृत्ती, सांघिक भावना आणि परस्पर समन्वय वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

सदर समारोप कार्यक्रमास श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्रीमती पूजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक (गृह), नागपूर ग्रामीण जिल्हा, सर्व उपविभागीय

पोलीस अधिकारी, सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस मुख्यालयातील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील स्पर्धासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.








मुख्यालय संघ





# जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक पोलीस अधीक्षक कार्यालय,नागपुर ग्रामीण ,नागपुर येथे पडली पार

आज दिनांक १५/१०/२०२६ रोजी जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षेखाली पोलीस अधीक्षक कार्यालय,नागपुर ग्रामीण, नागपुर येथे पार पाडली. सदर बैठकीत श्रीमती विनीता व्यास, उपवनसंरक्षक, नागपुर वन विभाग , श्री नितेश देवगडे, विभागिय वन अधिकारी, (दक्षता), श्री यश काळे, सहा वनसंरक्षक, सेमिनरी हिल्स, नागपुर, श्री गोविंद लुचे, सहा वनसंरक्षक ,नागपुर , श्री मनोज धनविजय, सहा वनसंरक्षक, उमरेड , NHAI, MSEDCL, PWD चे अधिकारी , वनपरिक्षेत्रीय अधिकारी , श्री रविंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक, लोहमार्ग, नागपुर, पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण तसेच मानद वन्यजीव रक्षक हजर होते. सदर बैठकीत मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या तसेच वन्यजीव संरक्षण, व्याघ्र संवर्धन आणि संबंधित विषयांवर चर्चा करण्यात आली.

- वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना दिल्या.
- वन्यजीव प्राण्यांसाठी तयार करण्यात आलेल्या बायपास रस्त्यांची साफ सफाई करण्याबाबत ,NHAI,PWD विभागाला सुचना देण्यात आल्या.
- वन्यजीवांची जिवीत हानी टाळण्यासाठी जंगलालगत असलेलया खुल्या वहीरींवर जाळी /कठडे लावण्याबाबत सुचना दिल्या.
- जंगल सफारी मध्ये मोबाईल फोन नेण्यासाठी प्रतिबंध घातला असुन याबाबत काटेकोरपणे पालन करण्याबाबत सुचना दिल्या.
- NHAI विभागाने प्राण्यांच्या वावरांबाबत wild life साईनबोर्ड लावले असुन त्यांचे GPS मॅपींग करण्याबाबत सुचना दिल्या.


महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण


पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण

# पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत सराईत गुन्हेगार 'धोकादायक व्यक्ती' प्रकाश महादेव बोरकर याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन मौदा :— **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन एम , सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली मौदा पोलीसांनी प्रकाश महादेव बोरकर, वय ३७ वर्ष, रा. खराडा (पुनर्वसन), ता. मौदा पो. स्टे. मौदा, जिल्हा नागपूर या सराईत गुन्हेगार तसेच 'धोकादायक व्यक्तीला एमपीडीए कायदयाअंतर्गत १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे.**

सराईत आरोपी गुन्हेगार प्रकाश महादेव बोरकर, वय ३७ वर्ष, रा. खराडा (पुनर्वसन), ता. मौदा पो. स्टे. मौदा, जिल्हा नागपूर याचे विरूध्द **मालमत्तेविरुध्द, साथीदारांसोबत मिळून अवैधरीत्या गोवंशीय जनावरांची तस्करी करून कत्तलीकरीता विक्री करणे तसेच शिवीगाळी करून मारण्याची धमकी देणे असे अनेक गुन्हे नोंद** असुन आरोपीच्या कृत्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले आणि अटक केले. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. नमुद आरोपी गुन्हे करण्याच्या सवयीचा असुन त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती.

**आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मौदा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. दिनांक १३/१०/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार प्रकाश महादेव बोरकर, वय ३७ वर्ष, रा. खराडा (पुनर्वसन), ता. मौदा पो. स्टे. मौदा, जिल्हा नागपूर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला असुन मौदा पोलीसांनी २४ तासाच्या आत आरोपीचा शोध घेवुन दिनांक १४/१०/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन जिल्हा जिल्हा मध्यवर्ती कारागृह भंडारा येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



स्थानबध्द गुन्हेगार प्रकाश महादेव बोरकर

# पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत सराईत गुन्हेगार 'धोकादायक व्यक्ती' दिपक मनोहर टेकाडे याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन जलालखेडा :— **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे , उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनाखाली जलालखेडा पोलीसांनी दिपक मनोहर टेकाडे, वय ३७ वर्ष, रा. रोहना, ता.नरखेड जिल्हा नागपूर या सराईत गुन्हेगार तसेच 'धोकादायक व्यक्तीला एमपीडीए कायदयाअंतर्गत १ वर्षाकरीता स्थानबध्द केले आहे.**

सराईत **गुन्हेगार दिपक मनोहर टेकाडे, वय ३७ वर्ष, रा. रोहना, ता.नरखेड जिल्हा नागपूर** याचे शरीराविरुध्द तसेच मालमत्तेविरुध्द अनेक गुन्हे नोंद आहे. (**खुनाचा प्रयत्न, चोरीकरणे, महीलाविरूध्द गुन्हे, अश्लील शिवीगाळ करणे, शासकीय कामकाजात अडथळा करणे,धमकी देणे, दारु पिवुन धुमधाम करणे**). आरोपीच्या कृत्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या

लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले आणि अटक केले. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. नमुद आरोपी गुन्हे करण्याच्या सवयीचा असुन त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती.

**आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने जलालखेडा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. दिनांक १३/१०/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर नमुद आरोपींचा स्थानबध्दतेचा आदेश काढला . नमुद आरोपी मिळुन येत नव्हता जलालखेडा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक पुरव्याच्या अधारे सदर आरोपींचा शोध घेवुन त्याला दिनांक १४/१०/२०२६ ररोजी ताब्यात घेतले. नमुद आरोपीला जिल्हा मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे स्थानबध्द केले आहे.**




**स्थानबध्द गुन्हेगार दिपक मनोहर टेकाडे**

## निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक १४/१०/२०२६ रोजी मौदा पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सुधाकर जंगलुजी ढोणे, वय ५० वर्ष, रा. आजणगाव, ता. मौदा, जि. नागपुर यांनी फिर्याद दिली की, दिनांक ११/१०/२०२६ रोजी किशोर बारच्या बाजूला चिल्लर देशी दारूची दुकान,मौदा येथे फिर्यादीचा साळभाउ मनोहर यादवराव बोबडे, वय ५५ वर्ष, रा. आजनगाव, ता. मौदा जि. नागपूर हे गेले होते. यातील आरोपी नामे कमलेश आंनदराव तिजारे, रा. मौदा याने आपले देशी दारूच्या दुकानसमोरच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावरील सिमेंटचे पाण्याचे टाके धोकादायकरित्या व निष्काळजीपणे उघडे ठेवून पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे फिर्यादीचा साळभाउ मनोहर यादवराव बोबडे हे त्या टाक्यामध्ये पडून मरण पावले. देशी दारू दुकानचा मालक आरोपी कमलेश आंनदराव तिजारे, रा. मौदा यांच्या निष्काळजीपणामुळे मृतकाचा मृत्यु झाल्याने सदर आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी कमलेश आंनदराव तिजारे, रा. मौदा याचे विरूद्ध कलम १०६(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पोस्टे काटोल हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल:—** दिनांक १४/१०/२०२६ रोजी काटोल पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळणाऱ्याविरूद्ध कारवाई करत काटोल पोलिसांनी दोन गुन्हे दाखल केले असून, एकूण चार आरोपींविरुद्ध खालीलप्रमाणे कारवाई केली आहे.

कारवाई क्र. ०१) :— काटोल येथील ताराबाजार परिसरात आरोपी नामे उमेश हरीशंकर केला, वय ३५ वर्षे, रा. ताराबाजार, काटोल हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ३४०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण ३४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कारवाई क्र. ०२) :— काटोल येथील नेहरु मार्केट येथे आरोपी नामे १) निखील मनोहरराव महाजन, वय ३५ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल २) प्रकाश शालीकराम वरोकर, वय ६२ वर्ष, रा. राठी ले आउट काटोल ३) कपील डबरासे रा. काटोल हे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आल्याने आरोपींचे ताब्यातून पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ४२२०/—रूपये, ०१ अॅडरॉईड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकुण १४,२२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही कारवाईत एकुण १४,५५६/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दोन्ही कारवायांमध्ये एकूण दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, चार आरोपींविरुद्ध **कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक १४/१०/२०२६ बेला पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ बेला हद्दीतील मौजा जसापुर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एम एच ३२/बी ए ९९३८ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थाबविण्यासाठी सांगितले असता वाहन चालकाने वाहन न थांबविता तेथुन पळ काढला.पोलीसांनी त्याचा पाठलाग केला असता तो  मौजा जसापुर ते आष्टा रोडवर वाहन सोडुन पळुन गेला. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी एम एच ३२ बी ए ९९३८ चा चालक हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. बेला पोलीसांनी तात्काळ सदर आरोपीचा शोध घेतला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ३० निपा किंमती २४००/—रूपये २) एम एच ३२ बी ए ९९३८ असा एकुण किंमती ४५,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद चालक याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहीतीच्या आधारे सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे सोनु छतनराव ढोक, रा कानकाटी, पोस्ट कांडळ, ता समुद्रपुर,जि. वर्धा हा असल्याचे निष्पन्न केले.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये १२ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत आरोपी करणसिंह देवी प्रसाद, रा. घमाईच, पो. जल्लापूर, जि. कन्नोज (उ प्र) ह.मु. भवानी नगर वडोदा ता.कामठी जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी १. भूषण उर्फ सुरज रेवालाल निषाद, वय २० वर्ष, राह. वार्ड क्र २, नगरधन, इंदिरा टोली, ता. रामटेक जि. नागपुर २. तुषार सुरेंद्र मानकर, वय १८ वर्ष राह. मरार टोली नगरधन ता. रामटेक जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी १. पवन धर्मदास वानखेडे, वय २९ वर्ष, रा. स्टेट बँक जवळ वार्ड न. ०१, मांगपूरा पारशिवनी, त. पारशिवनी, जि. नागपूर २. हर्षल अशोक वासनिक, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र १६, पारशिवनी त.पारशिवनी जि.नागपूर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी साजन कैलासराव पारीसे, वय २७ वर्ष, रा. खैरगाव ता. नरखेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी प्रशांत गोविंदराव डोंगरे, वय ४१ वर्ष, रा. खैरी ता.काटोल, जि.नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी लक्ष्मण तुळशीराम अंबुडारे, वय ३२ वर्ष रा. खुटांबा,ता.काटोल हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी हरीश रामकिसन फंडे वय २२ वर्ष रा रूईखैरी ता जि नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन भिवापूर** अंतर्गत आरोपी १. क्रिष्णा सुरेश भोयर, वय २८ वर्ष, रा. राजा बक्षा हनुमान मंदीरच्या जवळ, मेडीकल चौक, नागपुर जि. नागपुर २. दिनानाथ शंभु शाहा, वय २८ वर्ष, रा.

मनीटोला गौनाह, वार्ड क्र ०५, पो गौनाहा थाना गौनाहा जमुनिया पश्चिम चंम्पारण राज्य बिहार, ह. मु. सोलर प्लट नक्षी रोड हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी गौरव हरिहरजी दांडेकर, वय २८ वर्ष, रा. संघ मैदान जवळ बुधवारीपेठ उमरेड हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— पोलीस निरीक्षक श्री. मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील दुर्गादेवी मंडळ व जीएनआयटी कॉलेज येथे सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांनी पोस्टे कुही हद्दीतील ज्येष्ठ नागरिका करिता मीटिंग घेऊन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. तसेच नवदुर्गा मंडळ कुही येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली.**

### म्यूल अकाउंटद्वारे होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

**नागरिकांनी अनोळखी व्यक्तींना स्वत:चे बँक खाते, ATM कार्ड, पासबुक किंवा इंटरनेट बँकिंगची माहिती वापरण्यास देऊ नये. तसेच, कमिशनच्या आमिषाने अनोळखी व्यक्तींची रक्कम**

स्वतःच्या खात्यात स्वीकारून इतर खात्यांत हस्तांतरित करू नये. अशा व्यवहारांमुळे नागरिक सायबर गुन्ह्यांच्या तपासात अडकण्याची व कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची शक्यता असते, याबाबत जनजागृती करण्यात आली.

### पेन्शनधारकांसोबत होणाऱ्या सायबर फसवणुकीबाबत जनजागृती

सायबर गुन्हेगारांकडून पेन्शनधारकांना पेन्शन सुरू ठेवणे, जीवन प्रमाणपत्र (स्पमि ब्मतजपपिबंजम) जमा करणे, झ्ल्ब अद्ययावत करणे किंवा पेन्शनची थकबाकी मिळवून देण्याच्या बहाण्याने फोन केले जातात. बँक अधिकारी किंवा शासकीय कर्मचारी असल्याचे भासवून त्यांच्याकडून बँक खात्याची माहिती, **ATM PIN, OTP** व इतर गोपनीय माहिती मिळवून आर्थिक फसवणूक केली जाते.याबाबत जेष्ठ  नागरिकांना जनजागृती करण्यात आली.

सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.






पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
व्हॉट्सॲप
अकाऊंट टेकओव्हर
फसवणूक
1930
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
पोस्ट करण्यापूर्वी विचार करा!


श्री गणेश डेकोरेशन
M. : 9623123377
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
फसवणूक झाली?
त्वरित तक्रार करा!
वेळीच केलेली तक्रार पुढील नुकसान टाळू शकते.
तक्रार करा →
घाबरू नका • पुरावे डिलीट करू नका • त्वरित तक्रार करा
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
महाराष्ट्र सायबर पोलीस
व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट
भाड्याने देणे / म्युल अकाउंट फसवणूक
1930
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
व्हॉट्सअ‍ॅप
अकाउंट टेकओव्हर
फसवणूक
1930
mhcyber.gov.in
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
माझी सायबर सुरक्षा प्रतिज्ञा
पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
पोस्ट करण्यापूर्वी विचार करा!
सार्वजनिक


पोलीस स्टेशन ,कळमेश्वर
माझी सायबर सुरक्षा प्रतिज्ञा
पोस्ट करण्यापूर्वी विचार करा!
फसवणूक झाली?
त्वरित तक्रार करा!

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन तसेच वाहतूक करणाऱ्यांवर ०७ गुन्हे दाखल,

**दिनांक १४/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन तसेच वाहतूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०७ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे राजेंद्र रामाजी रेवतकर, वय ४१ वर्ष, रा. वार्ड नं. १४, नरखेड त. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे नितीन केशवराव उईके, वय ३४ वर्ष रा. खडकी, ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १. कुंडलीक वामन वानी, वय ४४ वर्षे, रा. चनोडा, ता. उमरेड, जि. नागपुर २. एम एच ३२ बी ए ९९३८ चा चालक यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे सतीश विजय भोयर, वय २८ वर्षे, रा. गंगापुर झोपडपटटी टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे क्रिष्णा मनीलाल शाहु, वय ४३ वर्ष, रा. रामननगर घुरपडे ले आउट याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९७२० मिली देशी दारू, ०४ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ४९,७२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर